**विशेष दिवाणी दावा क्र.८५/२०२० मधील निशाणी क्र.४३ वरील आदेश**

(सन्मान शिक्षण संस्था सुखवाडी वगैरे वि. विष्णू गायकवाड)

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ चे मयत अध्यक्ष यांचे जागी नुतन अध्यक्ष यांना रेकॉर्डवर आणणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

०२. वादी क्र.१ चे असे कथन आहे की, प्रस्तुत कामातील वादी नं.१ सन्मान शिक्षण संस्था सुखवाडी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.संजय सुबराव यादव हे दि.३०.१२.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. पूर्वीचे अध्यक्षांचे रिक्त जागी अध्यक्ष म्हणून सदर संस्थेचे संचालक मंडळ सभा दि.०५/०२/२०२४ रोजीचे ठराव क्र.२ अन्वये श्री. बाळासोा सुबराव यादव, मु.सुखवाडी, पो. ब्रम्हनाळ, ता. पलूस जि. सांगली यांची ठराव नियुक्ती करणेत आलेली आहे व सदर संस्थेचे सभा अन्वये नुतन अध्यक्ष श्री. बाळासोा सुबराव यादव यांना याकामी संस्थेतर्फे वादी नं.१ चे प्रतिनिधी अध्यक्ष म्हणून हजर होवून सर्व कामकाज चालविणे, जाब जबाब देणे, सह्या करणे व आवश्यक ती सर्व कृती व पुर्तता करणे इत्यादी सर्व अधिकार देणेत आलेले आहेत. तरी १ अ हे संस्थेचे नुतन अध्यक्ष श्री. बाळासोा सुबराव यादव यांचे नाव वादी नं.१ या संस्थेकरिता अध्यक्ष म्हणून रेकॉर्डवर घेणेबाबत आदेश करण्यात यावा. तसेच वादी नं.१ चे वतीने हजर झालेले माजी अध्यक्ष यांचे नावापुढे मयत असे लिहिणेस व त्यांचेऐवजी नुतन अध्यक्ष यांचे नाव नमूद करणेस व दाव्याचे सरनामेत योग्य ती दुरूस्ती करण्यास परवानगी असावी अशी विनंती केली.

**प्रतिवादीतर्फे वादीने निशाणी क्र.४३ ला दिलेल्या अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे**–

०३. वादीचा नि.४३ चा अर्ज व त्यातील विधाने प्रतिवादीला मान्य नाहीत. वादीने नि.४३ चा अर्ज कायद्याच्या कोणत्या तरतुदीप्रमाणे दिला आहे याचा उल्लेख सदर अर्जात नाहीत. त्यामुळे, सदरचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे. एखाद्या संस्थेचा अध्यक्ष मयत झाला म्हणून नवीन अध्यक्ष रेकॉर्डवर आणण्याची कायद्यात तरतुद नाही. त्यामुळे वादीचा नि.४३ चा अर्ज रद्द करण्यात यावा. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादी नं.१ ही संस्था मुंबई सार्वजनिक न्यास – नोंदणी कायद्याप्रमाणे नोंद असलेली

संस्था आहे. तथापि वादीने सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यातील तरतुदीप्रमाणे सर्व ट्रस्टींना या दाव्यात पक्षकारच केलेले नाही. तसेच न्यासाची संस्थेची घटना हजर केलेली नाही. वर नमूद केलेप्रमाणे वादी नं.१ ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त नोंदणी कायद्याप्रमाणे नोंद असलेली संस्था आहे व अशा संस्थेबाबत दिवाणी कोर्टात संस्थेच्या वतीने दावा करताना मे. धर्मादाय आयुक्त यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. वादीने दाव्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांची दावा दाखल करणेसाठी पूर्वपरवानगी घेतली होती किंवा नाही याचा उल्लेख केलेला नाही. तसेच तशी तथाकथित परवानगी या दाव्याच्या कामी हजर केलेली नाही या सर्व घटना व तरतुदी विचारात घेवून वादीचा नि.४३ चा अर्ज रद्द करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली.

०४. प्रस्तुतकामी वादी क्र.१ तर्फे विद्वान विधीज्ञ व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज वादी क्र.१ यांनी सन्मान शिक्षण संस्था, सुखवाडी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय सुबराव यादव हे दि.०३.१२.२०२३ रोजी मयत झालेले असलेने व त्यांचे रिक्त जागी संचालक मंडळाची सभा दि.०५.०२.२०२४ रोजीचे ठरावाने श्री.बाळासो सुबराव यादव यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. तरी त्याअनुषंगाने दाव्यामध्ये पूर्वीचे अध्यक्ष यांचे नांवापुढे मयत असे लिहीणेस व त्यांचेऐवजी नुतन अध्यक्ष यांचे नांव नमूद करणेस व दाव्याचे सरनामेत दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

०५. तर प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी केवळ ठरावाने पूर्वीचे अध्यक्षांचे जागी नवीन व्यक्तीची नेमणूक केली म्हणून वादींना अशी दुरुस्ती मागता येणार नाही. तर त्या संदर्भात त्यांनी पहिल्या अध्यक्षांचे नांव कमी करुन नवीन अध्यक्षांचे नांव रेकॉर्डवर घेणेकरिता सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांचेकडील बदलाबाबतचा रिपोर्ट करुन याकामी दाखल करणे आवश्यक ठरते. परंतु, प्रस्तुत वादी यांनी तसे केले नसलेने त्यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

०६. युक्तीवादाचे दरम्यान वादीतफेर्फ विधीज्ञ यांनी फेरिस्त निशाणी क्र.६०

ने अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग यांचेकडील बदलाचा अहवाल (Change report) सादर केलेला आहे. अशा परिस्थितीत वादी प्रस्तुत निशाणी क्र.४३ चे अर्जाने नमूद करीत असलेले नांवाबाबत वादी यांनी नांव बदलाबाबतचा अहवाल याकामी दाखल केलेला असलेने मला प्रस्तुत अर्ज मंजूर करणेस कोणताही अडथळा असलेचे दिसून येत नाही. तसेच या प्रक्रियेकरिता काही कालावधी लागत असलेने झालेला विलंब देखील माफ होणेस पात्र ठरतो, या मताचा मी आहे. उपरोक्त विवेचनाचे अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादी क्र.१ यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादी यांनी उपरोक्त आदेशास अनुसरुन अर्जात मागितलेप्रमाणे दुरुस्ती करुन अभिलेखावर दाव्याची दुरुस्त प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी. |

AVINASH RAMAKANT MALVADE

Digitally signed by AVINASH RAMAKANT MALVADE
Date: 2026.03.07 17:32:50 +0530

विटा. (अ. र. माळवदे)

दिनांक ०७.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

*****

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F file are same, word to word, as per the dictation.

| | |
|---|---|
| Name of Stenographer: | S.V. Gaikwad, (Grade-II) |
| Name of the Court - | Civil Judge, Senior Division, Vita |
| Date of pronouncement - | 07.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer on - | 07.03.2026 |
| Order uploaded on - | 07.03.2026 |